३।५

# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-१०/नियम ८०/आदेश/**२७४५**/२०१५
दिनांक : ३० / १२ /२०१५

**वाचावे :** महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ चे नियम ८०

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ चे नियम ८० मध्ये सहकारी संस्थांच्या निवडणूकीत होणाऱ्या मतदानाची गुप्तता राखणे हे निवडणूकीत सहभागी होणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य असेल अशी स्पष्ट तरतुद आहे. सदर तरतुदीप्रमाणे समिती निवडणूकीच्या प्रत्येक टप्प्यावर म्हणजेच संचालक मंडळाची निवडणूक किंवा पदाधिकाऱ्यांची निवडणूक यामध्ये मतदानाची गुप्तता राखली जाणे अनिवार्य आहे.

तथापी, सदर तरतुदीचे काही प्रसंगी उल्लंघन होत असल्याचे प्राधिकरणाच्या निदर्शनास आले आहे (उदा. हात उंचावुन मतदान घेणे). त्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ चे नियम ८० चे गांभीर्यपूर्वक अनुपालन होणाच्या दृष्टीकोनातुन आणि सहकारी संस्थांच्या निवडणूकांचे खुल्या व नि:पक्षपाती वातावरणात संचलन व्हावे यासाठी उक्त नियमांचे नियम ३ (v) अन्वये आदेश देणे क्रमप्राप्त असल्याचे मत झाल्यामुळे प्राधिकरण खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहेत.

**-: आदेश :-**

'महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब' व 'महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ चे नियम ३(v)' अन्वये राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त झालेल्या अधिकारानूसार, महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ चे नियम ८० मधील तरतुदीचे निवडणूकीच्या प्रत्येक टप्प्यावर म्हणजेच संचालक मंडळ निवडणूक व पदाधिकारी निवडणूक या दोन्ही टप्प्यावर गांभीर्य पूर्वक अनुपालन करण्याचे आदेश देण्यात येत आहेत.

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांचे आदेशाने.**

(डॉ. आनंद जोगदंड)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,

१. जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व).
२. तालुका सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)

**प्रत सस्नेह रवाना** :- १. मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. मा.साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. मा.संचालक, हातमाग,यंत्रमाग व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपुर
४. मा.आयुक्त (दुग्ध विकास), महाराष्ट्र राज्य, अब्दुल गफार खान मार्ग, वरळी सी फेस, मुंबई
५. मा.पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

E:\pradhikaran1\letrs\देश.सर\नियम 80 आदेश.docx